Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 533 – 538

DOI: 10.5281/zenodo.10137389

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना

प्रा.डॉ. मदन लक्ष्मण शेळके

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: shelkeml240583@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रास्ताविक

महात्मा गांधीजींनी आपल्या जीवनामध्ये अनेक क्षेत्रात कार्य केले आहे. त्यांचे कार्यक्षेत्र हे अत्यंत व्यापक होते. त्यांच्या संपूर्ण कार्याचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यापेक्षा जास्त कार्य हे ग्रामीण विकास व स्वयंपूर्ण भारत या विषयावर केले. भारतीयांचा विकास करण्यासाठी ग्रामीण विकासाची कास धरली. भारत हा खेडयांचा देश असल्यामुळे भारताच्या विकासामध्ये ग्रामीण विकासाची भूमिका ही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. आज भारतातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास दोन तृतीयांश लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्य करीत आहेत. भारतामध्ये आज घडीला सहा लाखापेक्षा अधिक खेडी आहे. महात्मा गांधीजींच्या मते, ग्रामीण भागाच्या विकासामध्ये भारताचा विकास सामावलेला आहे. म्हणजेच भारतातील खेडे गावाचा विकास हाच भारताचा विकास होय. भारताने आज स्वातंत्र्याचे 77 वर्ष पूर्ण केलेली आहेत. नियोजनाच्या 13 पंचवार्षिक योजना पूर्ण झालेल्या आहेत. नियोजनाच्या काळात ग्रामीण भागात खूप मोठया प्रमाणावर बदल झालेले आढळतात. उदा. शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, दूरसंचार, रस्ते इत्यादी सुविधामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा झालेली आढळून येते.

यह निर्विवादित रूप से सत्य है कि, भारत गाँव का देश है और गाँवो मे ही भारत की आत्मा बस्ती है| इसीलिए राष्ट्रपिता महात्मा गांधी कहा करते थे कि "भारत का ह्रदय गाँव मे बसता है, गाँव की उन्नती से ही भारत की उन्नती हो सकती है | गाँव मे ही सेवा और परिश्रम के अवतार किसान बसते है| "गांधीजी म्हणतात की, स्वराज्य ही कोणाही एकाची मक्तेदारी नाही तर स्वराज्य हे सर्वांचेच असते. ती केवळ भांडवलदार व शिक्षित लोकांची मक्तेदारी नाही. स्वराज्यात कोणत्याही प्रकारचा उच्च नीच भाव व भेदभाव असूच शकत नाही. जितके उच्चभ्रू लोकांसाठी असू शकेल

त्यापेक्षाही जास्त ते श्रमिकांसाठी व दिन-दुबळ्यांसाठी असेल. गांधीजी म्हणतात की, "माझ्या स्वप्नातले स्वराज्य हे गरिबांसाठी असलेले स्वराज्य आहे". जीवनावश्यक असलेल्या सर्व सुख सोयी सर्वांनाच उपभोगता येणे त्याला स्वराज्य म्हणता येईल. त्या जोपर्यंत सर्वांना उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत स्वराज्य म्हणता येणार नाही. जात, धर्म, वंश, गरीब, श्रीमंत व सामाजिक दर्जा याबाबतीत कोणताही भेदभाव केला जाणार नाही तेच खरे स्वराज्य असे म्हणता येईल.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी निरीक्षणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये तथ्थ्य संकलन करण्यासाठी विविध दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला असून यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी पुढील उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत.

१) महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना समजून घेणे.

२) ग्राम स्वराज्याच्या घटकांचा आढावा घेणे.

**महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना**

ग्राम स्वराज्याची संकल्पना स्पष्ट करताना गांधीजी नेहमी म्हणत खरा भारत हा खेडयात आहे. म्हणूनच त्यांनी खेडयाकडे चला असा नारा दिला होता. देशाचा विकास करण्यासाठी संपूर्ण ग्रामीण भाग म्हणजे प्रत्येक खेडे हे स्वावलंबी असावयास हवे. गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना प्रामुख्याने आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण खेडयावर अवलंबून होती. गांधीजींना असे वाटत होते की प्रत्येक खेडे हे एक परिपूर्ण स्वतंत्र राज्य असावे. जिथे आपल्या आवश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी शेजाऱ्यावर अवलंबून राहण्याची गरज भासू नये. ग्राम स्वराज्याची संकल्पना मांडताना गांधीजी असे म्हणतात की, प्रत्येक गावात गावकऱ्यांना आपल्या कारभाराची पूर्ण सत्ता आणि अधिकार राहतील. ग्रामीण जनतेच्या हाती सत्ता आली म्हणजेच लोकांच्या स्वातंत्र्यावर होणारा हस्तक्षेप कमी होतो. जे राष्ट्र आपले कामकाज हस्तक्षेपाशिवाय शांततेने करून दाखवीते त्यालाच खऱ्या अर्थाने लोकशाही राष्ट्र म्हटले जाते.बाह्य नियंत्रणापासून मुक्त होण्यासाठी सतत प्रयत्न करणे हा ग्राम स्वराज्याचा अर्थ आहे.

गांधीजींच्या मते, 'बलशाली भारताचे स्वप्न साकार करावयाचे असेल आणि उद्याचा नवा भारत निर्माण करावयाचा असेल तर सर्वप्रथम खेडयांचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास झाला पाहिजे आणि त्यासाठी तरुणांनी खेड्यात जाऊन ग्रामसेवा केली पाहिजे. कारण ग्रामसेवा हीच देश सेवा आहे. गांधीजींच्या अर्थशास्त्राचा ग्राम स्वराज्य आणि स्वावलंबन हा गाभा होता. गांधीजींच्या ग्राम स्वराज्य संकल्पनेत स्वावलंबी समाज असेल आणि आपल्या

उपजीविकेसाठी दुसऱ्यावर अवलंबून राहणार नाही तर तो परस्परांच्या सहकार्याने काम करेल. गांधीजींना अन्न, वस्त्र व निवारा याबाबतीत स्वयंपूर्णता अपेक्षित होती.

**ग्राम स्वराज्याचे घटक**

खेडयांचा विकास म्हणजे भारताचा विकास होईल अशी गांधीजींची धारणा होती. त्यांनी नेहमीच खेड्यांच्या विकासावर भर दिला होता. खेड्यांचा विकास करण्यासाठी त्यांनी रचनात्मक कार्यक्रमाची आखणी केली होती. त्यामध्ये अस्पृश्यता निवारण, श्रमप्रतिष्ठा, ग्रामसफाई, सहकारी शेती, दारूबंदी, जातीय ऐक्य, ग्रामोद्योग, आरोग्य, ग्रामीण शिक्षण, आर्थिक समानता, स्वच्छता इत्यादी कल्याणकारी संकल्पनांचा समावेश होतो. गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेत खालील घटकांचा समावेश होतो.

**1) ग्राम**

गांधीजींनी आपल्या स्वराज्याच्या संकल्पनेत ग्राम किंवा खेडे हा घटक महत्त्वाचा मानला असून गावातील सत्ता तेथील लोकांच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या मार्फत चालविले जावे व त्याचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी व सेवेसाठी केला जावा. गांधींजींच्या मते, स्वराज्य म्हणजे मुक्ती पण गांधीजींना केवळ राजकीय स्वराज्य अपेक्षित नव्हते तर आर्थिक स्वातंत्र्य व समानता असणारे ग्राम स्वराज्य अभिप्रेत आहे. गावातील कायदे विभाग, शासन विभाग व न्याय विभाग या तिन्ही विभागाची सत्ता ग्रामपंचायतीकडे राहील. राज्य हे साध्य नसून व्यक्ती विकासाचे साधन आहे. व्यक्ती विकासासाठी सर्व सत्तांचे ग्रामपंचायतीत विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे.

**2) अस्पृश्यता निवारण**

गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे. ग्राम स्वराज्य निर्मितीसाठी अस्पृश्यता निवारण करणे गरजेचे आहे. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य अजन्म केले. वर्ग समन्वय निर्माण करण्यासाठी अस्पृश्यता निवारण करणे आवश्यक आहे. अस्पृश्यतेमुळे समाजाचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परमेश्वराने सर्व मानवांना समान निर्माण केले आहे. परंतू मानवाच्या स्वतःच्या स्वार्थासाठी उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा भेदभाव निर्माण केला आहे. गांधीजींच्या मते अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेला कलंक होय.

**3) श्रमप्रतिष्ठा**

गांधीजींनी आपल्या ग्राम स्वराज्य संकल्पनेत आदर्श समाजात शारीरिक श्रमाला अधिक महत्त्व दिले. प्रत्येक व्यक्तीने स्वतःचा जीवनचरितार्थ चालविण्या इतके तरी श्रम करणे आवश्यक आहे. व्यक्ती श्रीमंत असो की गरीब असो प्रत्येकाने श्रम करणे आवश्यक आहे. श्रम कोणतेही असो ती सर्व कामे समाजासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असे गांधीजींना वाटत असे. शारीरिक श्रम केल्यास व्यक्ती सदृढ, समाधानी व स्वावलंबी बनते.

**4) विकेंद्रीकरण**

गांधीजी हे आर्थिक व राजकीय विकेंद्रीकरणाचे पुरस्कर्ते होते. गांधीजींच्या मते, राजकीय सत्ता ही साध्य नसून व्यक्ती विकासाचे साधन आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. आदर्श राज्यात खेड्यांना मध्यवर्ती स्थान असावे. प्रत्येक खेडे स्वतंत्र व स्वयंपूर्ण असावे. हे करण्यासाठी खेड्यांना जास्तीत जास्त राजकीय स्वायत्तता द्यायला हवी. ग्रामपंचायत पंचांनी तंटे मिटवावे. पशुसंवर्धन, दूध उत्पादनात वाढ, सार्वजनिक स्वच्छता, अस्पृश्यता निवारण इत्यादी कामे करावीत.

**5) ग्रामोद्योग**

गांधीजींच्या मते, आर्थिक स्वयंपूर्णता निर्माण होण्यासाठी ग्रामीण उद्योगांना प्राधान्य दिले पाहिजेत. यामध्ये लघु व कुटीर उद्योग यांचा विकास करणे गरजेचे आहे. गावातील बेकारी व दारिद्र्य नष्ट करण्यासाठी ग्रामोद्योगाला चालना देणे आवश्यक आहे. गावातील बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. त्यासाठी ग्रामीण उत्पादनावर आधारित उद्योगांचा विकास करणे आवश्यक आहे. ग्रामोद्योगात घान्याचे तेल, पेंड, हडसरीचे तांदूळ, मध गोळा करणे, खेळणी तयार करणे, हातमाग इत्यादीचा समावेश होतो. गांधीजींनी खादी व चरखा यांना आपल्या कल्पनेत मध्यवर्ती स्थान दिले आहे. खेड्यातील प्रत्येक व्यक्तीने दिवसातून किमान एक तास तरी सूतकताई करावी ज्यातून गावाची गरज भागून शहरी भागात विक्री करून उत्पन्न मिळविता येईल.

**6) सहकारी शेती**

गांधीजींनी सहकारितेतून संपन्नता येते असा विचार मांडला. गावातील सर्व लोकांमध्ये सहकारी भावना असेल तर ग्रामविकास होतो. गावकरी ते राव न करी एवढे बळ सामूहिक शक्तीत असते. सहकारातून पतसंस्था, सहकारी उद्योग, दूग्ध विकास संस्था, कुक्कूटपालन असे उपक्रम यशस्वी होऊ शकतात. यामधूनच सहकारी शेतीची संकल्पना पुढे आली आणि 1942 मध्ये सामूहिक शेतीची संकल्पना गांधीजींनी मांडली. आजच्या घडीला भारतासारख्या देशाला सामूहिक शेतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. गावातील सहभागामुळेच हिवरे बाजार, राळेगणसिद्धी, पाटोदा या गावांनी ग्रामीण विकासाचे चांगले मॉडेल आपल्यासमोर ठेवले आहे.

**7) शिक्षण व्यवस्था**

गांधीजींचे शिक्षणासंबंधीचे विचार 'नयी तालीम' या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांच्या मते शिक्षण हे मातृभाषेतूनच असावे. ग्राम स्वराज्यात प्राथमिक शिक्षण विनामूल्य व सक्तीचे असावे. शिक्षण म्हणजे मनुष्याचा सर्वांगीण विकास होय. शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे ते एक साधन आहे. अहिंसात्मक समाज व्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय ठेवून त्यांना

शिक्षण द्यावे. विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान करून देताना वसुदैव कुटूंबकम् कल्पनेला प्राधान्य द्यावे. गांधीजींच्या मते व्यक्तीला स्वावलंबी बनविणारे शिक्षण असायला पाहिजे. कोणत्याही शिक्षणाचा उद्देश हा व्यक्तीचा सर्वांगीण विकास असतो. शिक्षण हे केवळ पुस्तकी स्वरूपाचेच न राहता रोजगार निर्मितीक्षम असावे.

**8) ग्रामीण अर्थव्यवस्था**

गांधीजींच्या मते, ग्रामीण अर्थव्यवस्था अशी असावी जेणेकरून प्रत्येक माणसाला अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजा पूर्ण करता येतील. मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक अशा वस्तूंचे उत्पादन ग्रामीण भागात झाले पाहिजे. खेड्यांना शहरावर अवलंबून राहण्याची गरज भासू नये. प्राथमिक गरजांची उत्पादन साधने सर्वसामान्य व्यक्तीच्या हातात असावीत. उदा. हवा, पाणी जसे सर्वांसाठी असते तशी उत्पादन साधने सर्वांसाठी आवश्यक आहे. ग्रामीण भागात उत्पादन वाढीबरोबरच उत्पादनाचे योग्य वितरण झाले पाहिजे. स्थानिक संसाधनाचा उपयोग करून ग्रामीण विकास करण्यात यावा असे गांधीजींना वाटत होते.

**सारांश**

आधुनिक भारतीय विचार प्रणालीमध्ये गांधीजींच्या विचारास अनन्य साधारण असे महत्त्व आहे. आधुनिक काळात गांधीजींनी अत्यंत प्रभावी अशी विचारसरणी मांडली. या विचारप्रणालीचा प्रभाव केवळ भारतापुरताच मर्यादित न राहता त्याने संपूर्ण जगास गवसनी घातली. सत्य आणि अहिंसा या दोन महत्त्वाच्या तत्त्वावर गांधीवादी विचारसरणी अवलंबून आहे. गांधीजींनी यंत्र प्रधान संस्कृतीला तीव्र विरोध केला. कारण यंत्र प्रधान संस्कृतीमुळे आर्थिक विषमता, प्रदूषण, बेरोजगारी आणि समाज जीवनातील विस्कळीतपणा यासारख्या बाबी दिसून येतात. म्हणूनच त्यांनी ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी ग्रामोद्योगांवर भर दिला. गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना व्यक्तीच्या श्रमाला प्रतिष्ठा देणारी व खेड्यांना स्वावलंबी बनविण्यात सहाय्यक आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे जोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही असे गांधीजींचे मत होते.

**संदर्भ ग्रंथ**

1) डॉ. प्रतिभा पाटील "महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास", एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद (2013)

2) पोळकर पराग "गांधीजी जीवन और विचार"

मंगेश प्रकाशन, नागपूर (2007)

3) एम. के. गांधी ग्राम स्वराज्य, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, प्रकाशन, पुणे 1995

4) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन (2010)